
आमाडेउस मोझार्ट

लेखक: इबी लेप्स्की   चित्रे: पाओलो कार्डोनी



मराठी अनुवाद: सुशील मेन्सन





आमाडेउस हा एक खेळकर, आनंदी मुलगा होता. तो इकडे-तिकडे पळत असे, उड्या मारत असे आणि आपल्या बहिणीच्या, मरियानाच्या मागे धावत असे. मरियाना त्याच्यापेक्षा पाच वर्षांनी मोठी होती. तो आपल्या पिवळ्या रंगाच्या छोट्या कुत्र्याशी, *पिंपर्ले*शी, शर्यत लावत असे, *टेरेसा* या आचाऱ्याच्या खोड्या काढत असे. त्याला सतत वळवळ करायला आवडत असे. कुणी त्याला शांत राहायला सांगितलं तर तो आपल्या टाचा आपटत असे आणि डोळे अस्वस्थपणे मिचकावत असे.




त्याला शब्दांसोबत खेळायला आवडत असे. काहीवेळा तो मजेशीर, विचित्र गाणी बनवत असे, जसे:

“मोठ्या शिडांच्या बोटी

वादळाआधी पळतात

वारा पडल्यावर थांबतात.”




फक्त संगीत त्याला शांत आणि स्थिर ठेवत असे. त्याचे वडील मरियानाला संगीत शिकवत तेव्हा आमाडेउस शांतपणे हालचाल न करता एका कोपऱ्यात बसून ऐकत असे. त्यावेळी त्याची आई सुटकेचा नि:श्वास टाकत असे.



एके दिवशी आमाडेउस अचानक स्टुलवर चढून पियानोपाशी बसला. त्याच्या वडिलांनी मरियानाला नुकतीच शिकवलेली धुन तो वाजवू लागला. कुणाकडून शिकला नसला तरी त्याने गाणं अचूक वाजवलं, एकही स्वर न चुकवता.

संगीतात प्रवीण असलेल्या त्याच्या वडिलांना जाणवलं की आमाडेउसकडे संगीताचं विशेष कौशल्य आहे. त्याच्याकडे विलक्षण संगीत स्मृती आहे.

त्या दिवसापासून, आमाडेउसचे वडील त्याला व्हायोलिन आणि पियानो शिकवू लागले. आमाडेउस सहजतेने शिकत गेला आणि लवकरच त्याने मरियानालाही मागे टाकलं.



पण या यशाने आमाडेउस हुरळला नाही. झगमगत्या संगीत कार्यक्रमांनी तो आंधळा झाला नाही. त्याला संगीत ही महान देणगी आहे, याची जाणीव होती. जगानेही त्याला मिळालेल्या या देणगीची खूप प्रशंसा केली. पण आमाडेउस, त्याचं कुटुंब आणि इतर काही लोक यांच्याव्यतिरिक्त सर्वांनीच आमाडेउसची प्रतिभा ओळखली नव्हती. त्यांनी आमाडेउसचं फक्त सादरीकरण पाहिलं होतं, त्याची कलात्मक बाजू पाहिली नव्हती.

त्यामुळे काहीवेळा त्याच्या संगीत कार्यक्रमात अशा प्रकारची घोषणा होत असे:

श्रोत्यांच्या एकमुखाने केलेल्या मागणीमुळे,

आमाडेउस मोझार्ट आज 30 ऑगस्ट रोजी आणखी एक संगीत कार्यक्रम सादर करेल आणि तुम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का देईल. फक्त सहा वर्षांचा मुलगा पियानो आणि व्हायोलिनवर मोठमोठ्या संगीतकारांच्या कठीण संगीतरचना वाजवेल. एवढंच नव्हे तर तो पियानोचा कीबोर्ड कापडाने झाकून पियानो आणि व्हायोलिन वाजवून दाखवेल.


याशिवाय, तो पियानो, बेल, ग्लास वा इतर वस्तुंवर वाजवलेले स्वर अचूक ओळखून दाखवेल. शेवटी तो पियानो आणि ऑर्गनवर स्वतःच्या धुन वाजवून दाखवेल.



मरियानाचं आपल्या लहान भावावर फार प्रेम होतं. त्याच्या यशाचा तिला मत्सर वाटत नसे, उलट अभिमानच वाटत असे.

आमाडेउसच्या आईला मुलाने स्वत: तयार केलेल्या पियानोवरच्या छोट्या छोट्या रचना (सोनाटा) ऐकायला खूप आवडत असे.


काही काळानंतर, आमाडेउसच्या वडिलांनी आपल्या मुलाच्या विलक्षण कौशल्याची ओळख साऱ्या जगाला करून द्यावी, असं ठरवलं. या निर्णयानंतर, आमाडेउसचं आयुष्य एखाद्या परीकथेसारखं बनलं.



वयाच्या सातव्या वर्षी, इतर मुलं शाळेत जात, तेव्हा आमाडेउस बहीण आणि वडिलांसोबत युरोपातील राजेशाही महालांमध्ये जाऊ लागला. सर्वत्र राजे, सम्राट, राण्या, राजपुत्र, राजकन्या यांच्याकडून त्याचं कौतुक होऊ लागलं, जयजयकार होऊ लागला.



त्याकाळी युरोपातील राजपरिवार सोहळे आणि कार्यक्रम आयोजित करण्यात एकमेकांशी स्पर्धा करत. ते नृत्य, नाटक, संगीत असे एकामागोमाग एक कार्यक्रम ठेवत. त्यांना लहान आमाडेउसबद्दल कळलं. तो एकदा ऐकलेली कठीण धुन तशीच्यातशी व्हायोलिनवर आणि पियानोवर वाजवून दाखवतो, त्याच्या अद्भूत संगीत रचना ऐकायला, त्याचं कौतुक करायला लोकांना खूप आवडतं हेदेखील त्यांना कळलं. राजदरबारातल्या संगीत कार्यक्रमासाठी आमाडेउसने सुंदर कपडे आणि सॅटीनचे निळे बूट घातले, कमरेला छोटी तलवार अडकवली. आता तो छोट्या घोडेस्वारासारखा दिसू लागला. त्याला पियानोसाथ करण्यात मरियानाला अभिमान वाटू लागला.



आमाडेउस व्हायोलिन वाजवू लागे तेव्हा स्त्रिया पुढे झुकून दुर्बिणीतून त्याला एकटक न्याहाळत आणि खात्री करून घेत की तो खरोखरच लहान मुलगा आहे, बुटका माणूस नाही. इटलीतल्या एका कार्यक्रमात, राजा-राणीसमोर वाजवताना, आमाडेउसला आपल्या बोटातली अंगठी काढावी लागली. कारण लोकांना वाटलं की त्याचं अद्भूत कौशल्य हा त्या अंगठीचा चमत्कार असू शकतो.



पण आमाडेउसचं कौशल्य हे काही कुठल्या जादुमुळे नव्हतं. त्याने केसांचा टोप आणि घोडेस्वाराचे कपडे घातले तरी तो एक लहान मुलगाच होता. त्याने अनेक सम्राट, राजे, राण्या यांच्यासमोर कार्यक्रम सादर केले आणि त्यांच्याकडून प्रशंसा, कौतुक, भेटवस्तू प्राप्त केल्या.

या साऱ्यामुळे आमाडेउस गर्विष्ठ झाला का? राजवाड्यातल्या वैभवामुळे तो रोजच्या मौजमजेला मुकला का? नाही, आमाडेउस पूर्वीसारखाच राहिला. कार्यक्रमानंतर, जयजयकारानंतर तो छोटया राजपुत्रांसोबत खेळत असे, राजकन्यांमागे पळत असे, मरियानामागे पळत असे तसंच!



रात्री आमाडेउस आपण रचलेली विचित्र मजेदार गाणी वडिलांना ऐकवल्याशिवाय झोपी जात नसे. तो गात असेः

“ऑरगॅनिया फिटाफॅग्निया.”

ते झाल्यावर, तो वडिलांच्या नाकाचा पापा घेत असे.

आमाडेउसने स्वतःचं एक काल्पनिक साम्राज्य बनवलं होतं. तो त्याला *रुकेनचं राज्य* म्हणत असे. तो स्वतःच त्याचा राजा होता. रुकेनमध्ये, प्रत्येक नागरिक चांगला आणि विश्वासू होता. आमाडेउसने त्याच्या या काल्पनिक साम्राज्याचा नकाशाही काढला होता. त्यातल्या शहरांना, नद्यांना आणि पर्वतांना त्याने नावं दिली होती.



आमाडेउसच्या कार्यक्रमाची घोषणा वाचून लोक त्याला मनोरंजक गंमतीचा कार्यक्रम समजत. कारण त्याच्यासोबत जादूगार, डोंबारी आणि दोरखंडावर कसरती करणारे लोकही आपापलं सादरीकरण करत.

“छोटा मोझार्ट प्रभावी मुलगा आहे, शंकाच नाही!” कार्यक्रम बघून एक समीक्षक म्हणाले.

सुदैवाने, आमाडेउसच्या वडिलांना उमगलं की हे दौरे आणि कार्यक्रम आपल्या मुलाला त्याचे अद्भूत गुण विकसित करण्यास रोखत आहेत.

शिवाय आमाडेउसही थकून जात असे. त्याचे गाल पूर्वीसारखे लालबुंद दिसत नसत. त्याचा खट्याळपणाही बंद झाला होता.



म्हणून त्याच्या वडिलांनी त्याला घरी न्यायचं ठरवलं.

“छान,” आमाडेउस म्हणाला. “मी माझ्या रुकेनच्या राज्यात परतेन.” कसलाही खेद न बाळगता तो पॅरिस, लंडन, व्हिएन्ना येथील राजवाडे तसंच लोकांची प्रशंसा आणि जयजयकार सोडून वडील आणि बहिणीसोबत घरी परतला.



घरी आमाडेउस फक्त खेळत बसला नाही. आपल्या मनात असलेल्या संगीतरचना विसरू नयेत म्हणून त्याला त्या लिहून काढायच्या होत्या.

कित्येक तास तो हे काम करत बसला.



त्याला बघून त्याचे कुटुंबीय आनंदीत झाले. त्याचा लाडका कुत्रा पिंपर्ले आनंदाने भुंकू लागला. त्याच्या आईने मायेने त्याला मिठीत घेतलं.

देवाने आपल्या मुलाला दिलेल्या या प्रतिभेची जबाबदारी आपली आहे, असं आमाडेउसच्या वडिलांना वाटे. त्यांनी आमाडेउससाठी एक अभ्यासक्रम तयार केला. तो खूप कठीण आणि आव्हानात्मक होता.



पण लहान आमाडेउसने खूप मेहनत घेतली. त्याने संगीतातल्या अनेक क्षेत्रांची सफर केली. त्याने सांगितिक अभिव्यक्ति करण्यासाठी नव्या प्रकारची शैली विकसित केली. त्याने सौंदर्य आणि परिपूर्णता यांची नवनवी उंची गाठली.

काळासोबत, आमाडेउसने जगातल्या सर्वात सुंदर संगीतरचना तयार केल्या आणि वुल्फगंग आमाडेउस मोझार्ट हा जगातल्या महान संगीतकारांच्या पंक्तित जाऊन बसला.

समाप्त